म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

# आर्यसमाजाचे नियम.

व

# दयानन्द पुस्तकालयाचे नियम.

सभ्य सभांमे पाहि येचसभ्याः सभासदः ।
त्वयेद्गाः पुरुहूत विश्वमायुर्व्यश्नवम् ॥

छापून,

प्रसिद्ध करणार,

मुंबई, आर्य्य समाजाच्या अंतरंग सभेच्या

हुकुमानें,

रा. रा. सेवकलाल करशनदास.

ह्यांनी

मुंबई,

"भारती छापखान्यांत छापिलें."

संवत् १९४५ इ. सन. १८८९.

प्रथमावृत्ति.

॥ ॐ ॥

# अंतरंग सभा.

**संवत १९४५ सालाची वहिवाट करण्यासाठीं नेमलेली.**

( ता. १७ वी फेब्रुआरी १८८९. )

## प्रमुख.

रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख. *

## उपप्रमुख.

रा. रा. हरिश्चंद्र श्यामराव कोठारे.

## मंत्री.

रा. रा. सेवकलाल करसनदास. *

## उपमंत्री.

रा. रा. बाळकृष्ण बापुजी आचार्य.

## कोशाध्यक्ष.

रा. रा. प्राणजीवनदास कहानदास. *

## पुस्तकाध्यक्ष.

रा. रा. आत्माराम बापु दळवी.

## सभासद.

डाक्टर मोरेश्वर गोपाळ देशमुख,
बी. ए., सी. एम्. डी.
शेठ जीवणदास मुळजी. *
,, सुंदरदास धर्मसी. *
,, लीलाधर हरी.
शेठ वसनजी खीमजी.
,, कानजी भगवान.
रा. रा. अण्णा मार्तंड जोशी.
,, परसोत्तम भगवानदास.
,, मंछाशंकर जैशंकर दवे

---

* आर्य समाजाच्या स्थानाचे रक्षक अर्थात ट्रस्टी.

# आर्य समाजाचे नियम.

१. सर्व सत्यविद्या व जे पदार्थ विद्येपासून जाणले जातात; त्या सर्वांचें आदिमूळ परमेश्वर आहे.

२. ईश्वर सच्चिदानंदस्वरूप, निराकार, सर्वशक्तिमान, न्यायकारी, दयाळु, अजन्मा, अनंत, निर्विकार, अनादि, अनुपम, सर्वाधार, सर्वेश्वर, सर्वव्यापक, सर्वांतर्यामी, अजर, अमर, अभय, नित्य, पवित्र, आणि सृष्टिकर्त्ता आहे. त्याचीच उपासना करणें योग्य आहे.

३. वेद सत्य विद्यांचें पुस्तक आहे. वेदांचें शिकणें शिकविणें व ऐकणें ऐकविणें हा सर्व आर्यांचा परम धर्म आहे.

४. सत्य ग्रहण करण्यास व असत्याचा त्याग करण्यास सर्वदा उद्यत राहिलें पाहिजे.

५. सर्व कामें धर्मानुसार अर्थात् सत्य व असत्य यांचा विचार करून केलीं पाहिजेत.

६. संसाराचा उपकार करणें हा ह्या समाजाचा मुख्य उद्देश आहे. अर्थात् शारीरिक, आत्मिक व सामाजिक उन्नति करावी.

७. सर्वांशीं प्रीतिपूर्वक व धर्मानुसार यथायोग्य वर्तलें पाहिजे.

८. अविद्येचा नाश व विद्येची वृद्धि केली पाहिजे.

९. प्रत्येकानें स्वतःच्या उन्नतिपासून संतुष्ट न रहावें, परंतु सर्वांच्या उन्नतींत आपली उन्नति समजली पाहिजे.

१०. सर्व मनुष्यांनीं सामाजिक सर्व हितकारी नियम पाळण्यांत परतंत्र राहिलें पाहिजे, व प्रत्येक हितकारी नियमांत सर्वांनीं स्वतंत्र रहावें.

## उपनियम.

१. ह्या समाजाचें नाव आर्यसमाज ठेविलें जाईल.

## उद्देश.

२. जो पूर्वोक्त नियमांत वर्णन केला आहे, तोच ह्या समाजाचा उद्देश होय.

## आर्य.

३. जे गृहस्थ आर्यसमाजांत नांव दाखल करूं इच्छितील व समाजाच्या उद्देशानुकूल वर्तन करतील, तेच आर्यसमाजांत दाखल होऊं शकतील.* परंतु त्यांचें वय अठरा वर्षांहून लहान नसलें पाहिजे.÷

---

* आर्य समाजांत नांव दाखल करविणें झाल्यास खालीं लिहिल्याप्रमाणें ग्रामस्थ अगर परग्रामस्थ गृहस्थांस मंत्र्यास लिहिलें पाहिजे कीं, "मी आर्यसमाजाच्या उद्देशानुकूल जें नियमांत वर्णन केलें आहे त्यांचा प्रसन्नतापूर्वक स्वीकार करतों. कृपाकरून माझें नांव आर्यसमाजांत दाखल करावें" अथवा मंत्र्याकडे जाऊन अगर प्रत्यही रविवारीं भरणाऱ्या सप्ताहिक सभेंत नवीन नांव दाखल करण्याची वही ठेविली आहे, तींत मंत्र्याच्या आज्ञेनें आपलें नांव लिहावें; परंतु अंतरंग सभेचा अधिकार राहिल कीं, स्पष्ट कारण दर्शविल्याशिवाय कोणाचेंही नांव आर्यसमाजांत लिहावयाचें ती स्वीकारणार नाहीं.

÷ विद्यार्थी अगर एखादा जिज्ञासु समाजांत दाखल होऊं इच्छील, तर त्यांस दाखल केलें जाईल; परंतु त्यास मत वगैरे देण्याचा अधिकार अठरावर्षांच्या वया नंतर दिला जाईल.

## आर्य सभासद.

४. सदाचरणानें ज्याचें नांव एक वर्ष राहील;* आणि तो सालिना आपल्या उत्पन्नांतून एक शतांश ÷ अथवा त्याहून ज्यास्त किंवा शक्त्यनुसार द्रव्यांश देईल, तोच आर्यसभासद होऊं शकेल.

क. संमति देण्याचा अधिकार फक्त आर्य्य सभासदांसच राहील.×

ख. जो आर्यसमाजाच्या उद्देशाविरुद्ध कृत्य करील, त्यास आर्य सभासद गणलें जाणार नाहीं.

ग. आर्य सभासद दोन प्रकारचे, एक साधारण व दुसरे माननीय (प्रतिष्ठित )आर्य सभासद होतील.

घ. जो उत्सुकतेनें अंतरंग सभेच्या स्वीकारानें कांहीं रकम एकदम देईल; अथवा ज्यास अंतरंग सभा विद्यादि गुणांनीं माननीय समजेल, तोच माननीय (प्रतिष्ठित-) सभासद होईल.

## साधारण सभा.

५. साधारण सभा तीन प्रकारच्या होतील. १. सप्ताहिक, २

---

* आर्य सभासद होण्याला आर्यसमाजांत एक वर्षपर्यंत नांव राहण्याचा नियम, एखाद्या व्यक्तीसाठीं अंतरंगसभा शिथिल करूं शकेल.

÷ राजा, सरदार अथवा मोठमोठे साहुकारादिकांस आर्यसभासद होण्याला शतांशच देणें आवश्यक नाहीं. त्यांनीं आपल्या उत्साहानें जें देणें तें एकदमच द्यावें.

+ अंतरंग सभा कांहीं विशेष कार्यासाठीं आर्यांची संमति योग्य आणि आवश्यक समजेल तर घेतील.

वार्षिक, व नैमित्तिक. पैकीं वार्षिक व नैमित्तिक ह्या सभा भरण्याचा वेळ इत्यादिकांची विज्ञापना समयानुकूल प्रथमच दिली जाईल.

## सप्ताहिक साधारण सभा.

६. ही सभा दर आठवड्यांतून फारकरून एकवेळ खालीं लिहिलेल्या कार्यासाठीं भरली जाईल.*

क. वेदमंत्रांचा पाठ; उपासना, भजन, कीर्तन व धर्मसंबंधी उपदेशासाठीं भरेल.

ख. हरएक सांसारिक उन्नतीचा उपदेश करण्यासाठीं.

ग. धर्म व व्यवहारसंबंधी वेगवेगळ्या मतमतांतरांचा शास्त्रार्थ व व्यवहार बुद्धीचा विचार करून, प्रीतिपूर्वक त्याचा विचार व निश्चय करून, प्रसंगोपात् वादविवादाची सभाही भरली जाईल.

घ. प्रत्येक सभेंत एखादी समाजसंबंधी महत्त्वाची गोष्ट सभेस कळविण्यालायक असल्यास ती सभेस कळविली जाईल.

ङ. ह्या सभेंत सर्वांस व्याख्यानादि श्रवण करण्यास येण्याची मोकळीक दिली जाईल. ×

## वार्षिक साधारण सभा.

७. ही सभा दरसाल खालीं लिहिलेल्या कार्यांसाठीं भरत जाईल.

---

* ह्या सभेचें काम चालविण्यास कोरम धरलें जाणार नाहीं. फक्त मंत्री, प्रमूख, व उपप्रमूख हजर असले, तरी सभेचें काम चालवितील. अगर इतर कोणतेंही अधिकारी प्रसंगानुसार काम चालवूं शकतील.

+ एखादा इतर आर्यसमाजाचा सभासद किंवा स्वदेशहितचिंतक पुरुष बाहेर गांवाहून आला असतां, त्यास व्याख्यान वगैरे देण्याची इच्छा असल्यास मंत्री व प्रमूख ह्यांच्या संमतीनें त्यास परवानगी मिळेल.

क. समाजाच्या उपनियमांत फेरफार करण्यास, अधिकारी व इतर अंतरंग सभासद नेमण्यास व गत सालची आवक जावक वगैरे हकीकत ऐकण्यासाठीं भरेल.

ख. समाजाचा वार्षिक उत्साह करण्यास, श्रावणी (उपनयन संस्कार) वगैरे वेदोक्त धर्मानुकूल कार्यांनिमित्त जे जे दिवस साधारण सभेनें पूर्वींच नेमले असतील, त्यांच्या पूर्ततेसाठीं समयोचित भरली जाईल.

ग. ही सभा होण्यापूर्वी विज्ञापन पत्रद्वारें एक महिना आगाऊ कळविलें जाईल.

## नैमित्तिक साधारण सभा.

८. ही सभा एखाद्या विशेष कामाकरितां जरूर लागल्यास खालीं लिहिलेल्या कामांसाठीं भरली जाईल.

क. जेव्हां प्रमूख व मंत्री ह्यांस नेमण्याची जरूर लागेल तेव्हां.

ख. अंतरंग सभेच्या इच्छेस येईल तेव्हां.

ग. जेव्हां आर्य सभासदांचा दशांशभाग ह्या निमित्तें मंत्र्याकडे पत्र लिहून कळवील तेव्हांही सभा बोलविली जाईल.

## अंतरंग सभा.

९. ही सभा समाजसंबंधी एकंदर कामें, जीं साधारण सभेनें उपस्थित केलीं असतील, त्यांच्या बंदोबस्तासाठीं भरली जाईल. हिच्यांत चार प्रकारचे सभासद दाखल होतील, ह्मणजे प्रतिष्ठित, ( माननीय ) अधिकारी, व्यवस्थापक व रक्षक ( ट्रस्टी. ).

क. प्रतिष्ठित सभासद, विशेष योग्यतेचे कारणांनीं वार्षिक किंवा नैमित्तिक सभेंत नेमले जातील, पण ते अंतरंग सभेच्या चतुर्थांशाहून अधिक नेमले जाणार नाहींत.

ख. प्रत्येक सालाच्या अंतीं अंतरंग सभेंतील तीन प्रकारच्या अधिकाऱ्यांस, ह्मणजे प्रतिष्ठित, अधिकारी व व्यवस्थापक ह्यांस साधारण सभेंत पुनः दाखल केलें जाईल; व तींत पूर्वींचे जुने सभासदही पुनः नेमतील.

ग. वर्ष भरण्यापूर्वीं एखाद्या प्रतिष्ठित, व्यवस्थापक अथवा अधिकारी ह्यांच्यापैकीं जागा रिकामी राहिल्यास त्यांच्या जागेवर एखाद्या सभ्य गृहस्थास अंतरंग सभा स्वतः नेमील.

घ. एखादें महत्त्वाचें कार्य करण्यास किंवा त्याविषयीं विवेचन करण्यास, आपणांपैकीं सभासद व त्या कामांत जाणणाऱ्या इतर आर्य सभासदांस मिळवून, उपसभा नेमून तें कार्य करूं शकतील.

ङ. अंतरंग सभेंतील एखाद्या सभासदास कांहीं विषय सभेकडे पाठविणें झाल्यास, मंत्रीद्वारें आठ दिवस आगाऊ विनंतिपत्र पाठविलें असतां अध्यक्षाच्या हुकुमान्वयें विदित केली जाईल. परंतु त्याजवर अंतरंग सभेंतील पांच सभासदांचें अनुमोदन लिहून आलें पाहिजे.

च. पंधरवड्यांतून एक वेळ मंत्री व प्रमूख ह्यांच्या आज्ञेनुरूप अंतरंग सभा भरत जाईल, अगर अंतरंग सभेंतील सभासदांची मंत्र्यापाशीं सूचना आल्यासही भरेल.

छ. एखादी विशेष अभिप्रायाची बाबत अंतरंग सभेपुढें दाखल करणें असल्यास, त्याविषयीं चार दिवस आगाऊ विज्ञापनपत्र काढलें जाईल, ह्मणजे त्यावरून सभासदांला विचार करण्यास अवकाश मिळेल.

## अधिकारी.

१०. अधिकारी पांच प्रकारचे नेमले जातील. १ प्रमूख, २ उपप्रमूख, ३ मंत्री, ४ कोशाध्यक्ष व ५ पुस्तकाध्यक्ष.

क. मंत्री, कोशाध्यक्ष, पुस्तकाध्यक्ष आणि उपप्रमूख ह्यांच्या अधिकारावर विशेष जरूर लागल्यास एकापेक्षां ज्यास्त अधिकारीही नेमले जातील, त्यांस अंतरंगसभा काम विभागून देईल.

ख. प्रत्येक अधिकाऱ्यानीं स्वतः जे जे प्रयत्न केले असतील, त्यांचा रीपोर्ट वार्षिक साधारण सभा भरण्यापूर्वी मंत्र्याकडे लिहून पाठविला पाहिजे.

## प्रमूख. (अध्यक्ष)

११. अध्यक्षाकडे खालीं लिहिलेलीं कामें व अधिकार दिले जातील.

क. अध्यक्षास अंतरंग सभा व समाजाच्या इतर सर्व सभेंचा सभापति नेमलें जाईल.

ख. सतत समाजाच्या एकंदर कामांचा योग्य बंदोबस्त करण्यांत व सर्वकाळ समाजाची उन्नति आणि रक्षण करण्यांत तत्पर रहावें. समाजाचें हरएक काम नियमानुसार केलें जात आहे किंवा नाहीं ह्या विषयीं तपास ठेवीत असावें.

ग. एखाद्या अवघड विषय असल्यास त्याची योग्य व्यवस्था ताबडतोब करावी. कारण, त्या जोखमांची जबाबदारी प्रमुखापासून विचारली जाईल.

## उपप्रमूख.

१२. उपप्रमुखास प्रमूख हजर नसल्यास त्याच्या जागीं प्रतिनिधि नेमलें जाईल. दोन किंवा अधिक प्रमूख असल्यास सभेच्या संमतिनुरूप त्यांपैकीं एखाद्यास प्रतिनिधि केलें जाईल. समाजाच्या सर्व कामांत साह्यता करणें हेंच त्यांचें मुख्य काम आहे.

## मंत्री.

१३. मंत्र्याकडे खालीं लिहिलेले अधिकार व कामें दिलीं जातील.

क. अंतरंग सभेच्या आज्ञानुरूप समाजमार्फत सर्वांबरोबर पत्रव्यवहार ठेवावा. समाजसंबंधी कागद, पत्रें, मागील हिशोबांच्या वह्या, हकीकतीची नोंद वगैरे सर्व सांभाळून ठेवावें.

ख. समाजाच्या सर्व सभेचा वृत्तांत लिहावा; व दुसरी सभा होण्यापूर्वी मागील सभेचा वृत्तांत पुस्तकांत लिहावा अगर लिहवावा.

ग. मासिक अंतरंग सभेंत मासिक सभेनंतर जे नवीन सभासद झाल्याची अगर निघाल्याची हकीकत नांव निशीवार कळवावी.

घ. सामान्येंकरून समाजाच्या नोकरांच्या कामावर दृष्टि ठेवावी; आणि समाजाचे नियम, उपनियम व व्यवस्था इत्यादिकांवर लक्ष्य द्यावें.

ङ. पुस्तकालय, मासिकपत्र, पाठशाला इत्यादि जीं जीं कामें साधारण सभेनें किंवा अंतरंग सभेनें उपसभेमार्फत करविण्याविषयीं व्यवस्था केली असेल, त्याप्रमाणें अंतरंग सभेच्या अभिप्रायानुरूप बंदोबस्त ठेवावा; व त्याविषयीं उपसभेस व अंतरंग सभेस वर्दी द्यावी.

च. एकंदर वेगवेगळ्या खात्यांच्या देवघेवीवर लक्ष द्यावें व एखादी अव्यवस्था आढळल्यास तावडतोब अंतरंग सभेस जाहीर करावें.

## कोशाध्यक्ष. ( खजीनदार ).

१४. कोशाध्यक्षाकडे खालीं लिहिलेले अधिकार व कामें सोपलीं जातील.

क. समाजाच्या सर्व आवक पैशांचा स्वीकार करावा; व त्याची पावती देऊन योग्य बंदोबस्त ठेवावा.

ख. अंतरंग सभेच्या हुकुमाशिवाय कोणासही पैसा देऊं नये. मंत्री व प्रमूख ह्यांस अंतरंग सभेनें चालू खर्चाशिवाय उचित कार्यासाठीं रकम देण्याचा हुकूम दिला असेल, त्याहून अधिक रकम देऊं नये. दिल्यास त्याबद्दलची जोखीमदारी व जबाब खजीनदारासच विचारलीं जातील.

ग. एकंदर आयव्यय पैशांचा रीतीपूर्वक जमा व खर्चाची वही ठेवावी. ती दरमहा मंत्र्यानें तपासल्यावर त्या हिशेबाची खातेवही वगैरे कागद अंतरंग सभेच्या स्विकारार्थ निवेदन करावे.

## पुस्तकाध्यक्ष.

१५. पुस्तकाध्यक्षाकडे खालीं लिहिलेले अधिकार व कामें गणलीं जातील.

क. पुस्तकालयांत जीं समाजाचीं स्थाईक व वीक्रीचीं पुस्तकें इत्यादि ज्या कांहीं ह्या संबंधी वस्तु असतील, त्या संभाळून ठेवाव्या. पुस्तका संबंधीं हिशोब ठेवावा. पुस्तकें द्यावीं; घ्यावीं; मागवावीं; विक्रीचें पण काम करावें; व त्या संबंधी असणारे नोकर लोकांच्या कामावर दृष्टी द्यावी.

ख. पुस्तकालयांत जे गृहस्थ पुस्तकें वाचण्यास अथवा उतरून घेण्यास येतील, त्यांची व्यवस्था पहावी आणि दरमहा होणाऱ्या जमा खर्चाचा हिशेब मंत्रीद्वारें तपासून अंतरंग सभेच्या स्विकारासाठीं निवेदन करावा.

ग. अंतरंग सभेच्या हुकुमाशिवाय कोणासही पुस्तक घरीं वाचावयास देऊं नये, दिलें असतां त्याची जबाबदारी पुस्तकाध्यक्षास विचारली जाईल.

## रक्षक. ( ट्रस्टी. )

१६. रक्षकांचे खालीं लिहिलेले अधिकार व कामें होत.

क. समाजाची स्थावर मिळकत अथवा मिळकती समाजाच्या लाभासाठीं रक्षकाप्रमाणें हमेश आपल्या नांवीं राखून, जेव्हां समाज आपल्या स्थानावर अन्य कोणास नवीन नेमील, तेव्हां समाजाच्या खर्चानें जो रक्षक नेमतील, त्याच्या नांवें ती फिरऊन द्यावी.

ख. साधारण वार्षिक सभा जशी आज्ञा करील, त्या आज्ञेनुरूप त्याची सर्व वहिवाट करावी; आणि ती इमारत किंवा इमारतींत तोड मोड वगैरे कांहीं काम निघेल, तर तें अंतरंग सभेच्या संमतीनें करवावें; आणि नवीन बांधकाम करणें झाल्यास, त्यांवर साधारण वार्षिक सभाद्वारें किंवा कत्राक्टानें काम केलें जाईल; त्याजवर देखरेख ठेऊन त्यांत अयोग्य वाटल्यास ताबडतोब अंतरंग सभेस जाहीर करून ती सांगेल त्याप्रमाणें योग्य व्यवस्था करावी किंवा करवावी.

ग. समाजाच्या मिळकती शिवाय एखादा समाजस्थ अगर आर्य बांधव आपली स्थावर अथवा जंगम मिळकत, जिवंत असतां रक्षक तर्फे किंवा पश्चात् व्यवस्थापक नेमून सोंपील, तर ती वार्षिक किंवा नैमित्तिक साधारण सभेच्या आज्ञेनुरूप आपल्या नांवीं ठेवावी. आणि त्यांत जीं जीं कामें फरमाविलीं असतील, तीं अंतरंग सभेच्या संमतीनें करावीं व केलेलीं कामें अंतरंग सभेस विदित करीत जावीं.

घ. हीं कामें करण्यासांठीं नोकर ठेवण्याचें अगत्य लागलें असतां, अंतरंग सभेच्या संमतीनें ठेवावे व त्यांच्या कामावर देखरेख ठेवावी.

ङ. एखादा रक्षक मृत झाल्यास किंवा समाजांतून निघाल्यास अथवा हरएक कारणांवरून समाज त्याला अयोग्य समजेल, तर त्याच्या जागीं अन्य कोणत्याही लायक आर्य सभासदास नैमित्तिक किंवा वार्षिक साधारण सभा नेमील. त्याच्या नांवावर स्थावर मिळकत समाजाच्या खर्चानें पूर्वी ज्याच्या नांवें असेल ; त्या इसमाच्या नांवावरून फिरवून समाज त्याच्या नांवीं चढवून देईल.

च. रक्षकांस कायद्या प्रमाणें ट्रस्टचें डिक्लेरेशन ह्मणजे रक्षकांचें प्रतिज्ञापत्र, आह्मीं फक्त ह्या मिळकतीचे रक्षक आहोंत, असें लिहून द्यावें लागेल.

## मिश्रित.

१७. सर्व आर्य सभासदांच्या संमतिपत्रद्वारें खालीं लिहिलेलीं कामें वेळानुसार घेतलीं जातील.

क. जेव्हां अंतरंग सभेचा निश्चय होईल कीं, समाजाच्या लाभासाठीं कोणी दुसरे साधारण समाजाच्या सिद्धांतावर विवेचन करूं नये; त्यावेळीं त्या विषयावर सर्व आर्य सभासदांची संमति घ्यावी लागेल.

ख. सर्व आर्य सभासदांचा दशांश अथवा त्याहून ज्यास्त भाग ह्या निमित्त मंत्र्याकडे पत्रद्वारें लिहून कळवील तेव्हांच संमति घेतली जाईल.

ग. जेव्हां अधिक खर्चासंबंधीं अथवा प्रबंधसंबंधीं नियम अथवा व्यवस्थेसंबंधी मुख्य विचार करणें झाल्यास, किंवा अंतरंग सभा सर्व आर्यसभासदांची संमती एखाद्या विशेष कामासाठीं मागेल तेव्हां पण पत्रद्वारें संमती घेऊं शकतील.

१८. जर एखाद्या सभेंत थोड्या वेळासाठीं एखादा अधिकारी हजर नसला, तर त्याच्या जागीं त्या वेळेपुरतें एखाद्या योग्य पुरुषास अंतरंग सभा नेमूं शकेल. तसेंच सभेचें कोरम पुरें न झालें तर त्यासमयीं उपसभा करून तें कार्य करूं शकती.

१९. एखादे अधिकाराचे जागीं वार्षिक साधारण सभेंत एखादा गृहस्थ नेमला नसेल; त्यास नेमण्याचा अधिकार अंतरंग सभेस दिला नसला, तर तोंपर्यंत त्याच अधिकाऱ्यास सोंपलेलें काम केलें पाहिजे.

२०. सर्व सभा व उपसभांचा वृत्तांत लिहिला जाईल; व तो मंत्र्याकडे पत्रद्वारें अगोदर कळविला असतां, सर्व आर्य सभासदांला पहावयास मिळेल.

२१. जेव्हां सर्व सभेचा चतुर्थांश भाग हजर असेल, तेव्हांच सर्व

सभेंची कामें सुरू होतील. पण जर दोनदां सभा बोलावून कोरम पुरें न झाल्यास जितके आर्य सभासद हजर असतील, त्यांचेंच कोरम गणून कार्य केलें जाईल.

२२. सर्व सभेंची व उपसभेंची कामें बहु पक्षानुसार ठरविलीं जातील; परंतु त्या सभेंत जो प्रमुख असेल तो दोन मतें देऊं शकेल.

२३. आवक रकमेंचा दशांश भाग शिलकेंत ठेविला जाईल.*

२४. सर्व आर्य किंवा आर्य सभासदांस संस्कृत किंवा आर्य (हिंदी) भाषा समजली पाहिजे. ×

२५.सर्व आर्य व आर्य सभासदांस उचित आहे कीं, लाभ, आनंद, व शुभाशुभ कार्य समयीं समाजाकडे लक्ष्य द्यावें.

२६. सर्व आर्य व आर्य सभादांस उचित आहे कीं, शोक व दुःखाचे वेळींपरस्पर मदत करावी, व आनंदोत्सवांत आमंत्रण आलें असतां लहान मोठेपणा न मानतां एकेमकांस साह्य व्हावें.

२७.एखादा आर्य किंवा आर्य सभासद कांहीं कारणानें अनाथ झाल्यास, किंवा एखाद्याची स्त्री विधवा किंवा तिची संतती अनाथ ह्मणजे उपजिवीकेस कोणतेंही साधन नसल्यास जर त्याविषयीं आर्य समाजाची खात्री झाल्यास, त्यांच्या रक्षणार्थ यथाशक्ती यथोचित प्रबंध करील. ÷

---

* जोंपर्यंत समाज स्थानादिक जीं जीं कामें समाजानें आरंभिलीं आहेत, तीं पुरीं होतील तों पर्यंत वरील नियम तहकूब ठेविला आहे.

×एखाद्या विशेष हेतु पुरःसर संकृत किंवा आर्य(हिंदी)भाषा न जाणारानें नांव समाजांत दाखल करण्यचा अधिकार अंतरंग सभेकडे राहील.

÷तसाच एखादा आर्य समाजाचा सभासद नसला,तरी सामान्य बंधुत्वाच्या नात्यानें, त्यास किंवा त्याच्या कुटुंबास समाजाला उचित वाटलें तर शक्यनुसार अंतरंग सभा भेट फंडातून साह्य करूं शकेल.

२८. आर्य किंवा आर्य सभासदांत एकमेकांशी हरएक बाबतींत वांधा-पडल्यास त्यांस हेंच योग्य आहे कीं, प्रीतीनें आपसांत समजावें; आणि तसें करून तंटा न मिटल्यास, समाजाच्या मंत्र्यास लिहून न्यायसभा बोलविण्याची मागणी करावी व त्या सभेच्या द्वारें दोन्ही पक्षकारांनीं आपला न्याय करवावा. विनाकारण फार खर्च करून कोर्ट दरबारांत जाऊन पायमल्ल होऊन परस्पर द्वेषाचें बीजारोपण करून घेऊं नये.*

२९. हे उपनियम प्रतिवर्षा नंतर यथोचित्, विज्ञापन दिल्यावर शोधून कमी ज्यास्त करूं शकताहेत.

---

* मंत्र्यास लिहिल्यानें अंतरंग सभेच्या संमतीनें तो न्याय सभा नियत करून उभय पक्षकारांस सभा भरण्यापूर्वी समय पाहून मंत्री त्याला सुचवील, परंतु न्याय सभेनें केलेल्या निकालावर पुनः विचार करण्याचा अधिकार समाजासच राहील.

॥ ॐ ॥

# दयानंद पुस्तकालयाचे नियम.

## नांव.

१. ह्या पुस्तकालयाचें नांव "दयानन्द पुस्तकालय" ठेवलें आहे.

## उद्देश.

२. हें पुस्तकालय श्रीमत् परमहंस परिव्राजकाच्यार्य श्रीमत् पंडित दयानंदसरस्वती स्वामींच्या नांवानें स्थापन करण्याचा मुंबई आर्य समाजाचा हेतु हाच कीं, ह्या महरपंडिताच्या अंगीं आपल्या भरत खंडांतील अनेक प्रकारच्या प्राचीन विद्येंचा उत्तरोत्तर क्रमशः ऱ्हास होऊं लागल्यामुळें त्यांचें पुनरुज्जीवन करण्याची फारच उत्कंठा होती; व पाश्चिमात्य पदार्थ विद्यादिकांचा आपल्या स्वदेश बांधवांत अभ्यास वाढविण्याचा उपदेश करून, शिवाय इतर कामींहीं बरेच परिश्रम घेत असे. ज्या कामासाठीं हा महत्पुरुष देशदेशांतरीं भ्रमण करीत असे, व जेथें जेथें जाई तेथें तेथें विद्यालयें व पुस्तकालयें स्थापण्याविषयींचा हमेशा उपदेश करीत असे. ह्मणून अशा स्वदेश हितवर्धक महरपुरुषाच्या अशाच एक उपकारक खात्यांत मुंबई आर्य समाजानें ह्या महरपंडिताच्या नाम स्मरणार्थ योग्य समजून ह्या पुस्तकालया बरोबर कायम ठेवण्याचा ठराव केला आहे. आणि ह्या पुस्तकालयाचा लाभ घेणारांनीं जितपत बनेल तितपत थोड्या खर्चानें लाभ देण्याचा ठराव केला आहे कीं, त्यापासून गरीब मनुष्य देखील ह्या पुस्तकालयाचा लाभ घेऊं शकेल. हा उत्तम हेतु सिद्धिस नेण्यास स्व-

देशहितचिंतक आर्य पुरुषांकडून योग्य मदत मागण्याचा व इतर योग्य उपाय योजण्याचा ठराव केला आहे.

## सभासद. *

३. ह्या पुस्तकालयाचे सभासदांत चार वर्ग केले आहेत. १जन्म पर्यंतचा सभासद, २पाहिले वर्गाचा सभासद, ३दुसरे वर्गाचा सभासद व ४तिसरे वर्गाचा सभासद.

क. जो गृहस्थ एकदम कमींत कमी ५० रुपये ह्या पुस्तकालयास बक्षीस देईल; तोच जन्म भर पहिल्या वर्गाच्या सभासदाचे सर्व हक्क भोगील. जो एकदम २५ रुपये देईल, तो जन्मभर दुसऱ्या वर्गाचे सर्व हक्क भोगील; व जो १० रुपये एकमद देईल तो तिसऱ्या वर्गाच्या सभासदाचे सर्व हक्क भोगील. एखाद्या पुरुषाच्या आंगीं असाधारण गुण असल्यास अगर एखाद्यानें पुस्तकालयास कांहीं लाभ करून दिला असेल; त्या कारणांनीं किंवा विद्यादिक गुणासांठीं किंवा द्रव्यांश देण्याची

---

* पुस्तकालयाचे सभासदांत नांव दाखल करविणें झाल्यास मंत्र्यास पत्र लिहिलें पाहिजे कीं, " ह्या पुस्तकालयाचे हल्लीं जे नियम आहेत व जे पुढें होतील; त्यांत आर्य समाजाची अंतरंग सभा फेरफार करील त्या प्रमाणें वागण्यास मीं कबूल आहे, ह्मणून माझें नांव ह्या पुस्तकालयाचे अमुक वर्गांत दाखल करावें. " पहिल्या दोन वर्गांचा सभासद होणारे सभासदांच्या पत्रांवर मुंबई आर्यसमाजाच्या दोन गृहस्थांची संमति असली पाहिजे. दुसऱ्या जन्म पर्यंतचे सभासद होणारांचें पत्रावर पुस्तकालयांतील पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गांतील दोन सभासदांचे अनुमोदन असलें तरी चालेल, परंतु मुंबई आर्यसमाजाचे अंतरंग सभेचा अधिकार राहील कीं, एखाद्या विशेष हेतुनें कारण दर्शविल्या वांचून कोणत्याही सभासदाचें नांव दाखल करण्यास स्विकार न करावा.

ज्यांस शक्ति नसेल; अशांस मुंबई आर्यसमाजाची अंतरंग सभा योग्यतेनुरूप वर्गवारीनें सभासद करूं शकेल.

ख. जो गृहस्थ प्रत्येक तिमाहीस दोन रुपये किंवा एक वर्षाचे आगाऊ सहा रुपये वर्गणी देईल, त्यास पहिल्या वर्गाचा सभासद केला जाईल; व त्यास क्रमानें पुस्तकें वगैरे वाचावयास दिलीं जातील, आणि त्याचा अमुक पुस्तकाचे सर्व भाग अथवा निरनिराळीं दोन पुस्तकें क्रमानें घरीं वाचावयास नेण्याचा हक्क राहील. तशींच वर्त्तमानपत्रेंही क्रमानें त्याचा पुढील अंक आल्यावर वाचण्याकरितां नेऊं शकेल.

ग. जो गृहस्थ प्रत्येक तीन महिन्यांनीं एकरुपाया किंवा एक वर्षाची अगाऊ ३ रुपये वर्गणी देईल; त्यास दुसऱ्या वर्गाच्या सभासदांत गणलें जाईल. व त्यास क्रमानें (पहिल्या वर्गाच्या सभासदांनंतर) मासिक पुस्तकें वाचावयास दिलीं जातील; व त्याचा क्रमानें एकदांच एकेक पुस्तक घरीं वाचावयास नेण्याचा हक्क राहील.

घ. जो गृहस्थ प्रत्येक तिमाहीस आठ आणे अथवा सालाचे १ रु० ८ आणे आगाऊ वर्गणी देईल, त्यास तिसऱ्या वर्गाच्या सभासदांत गणलें जाईल. त्याला फक्त पुस्तकालयांतच वाचावयाचा हक्क आहे.

## वार्षिक सभा.

४. ही सभा दरसाल खालीं लिहिलेल्या कार्यां निमित्तें भरली जाईल.

क. पुस्तकालयाचे नियमांत व वर्गणींत कमीज्यास्त करण्यांत, नवीन पुस्तकें, वर्त्तमान पत्रें व मासिक पुस्तकें मागविण्यासाठीं तसेंच पुस्तकालयाच्या विशेष हितावह असणाऱ्या अशा बाबदींची मुंबई आर्यसमाजाच्या अंतरंग सभेस सूचना करण्यासाठीं भरली जाईल. त्या सभेंत चारही वर्गाचे सभासद आपला विचार देऊं शकतील.

## व्यवस्थापक उपसभा.

९. ह्या पुस्तकालयाची वहीवाट करण्यासाठीं मुंबई आर्यसमाजाची अंतरंग सभा प्रतिवर्षी एक व्यवस्थापक उपसभा नेमील. तींत एक प्रमूख, एक मंत्री, व चार व्यवस्थापक सभासद आणि जे आर्य समाजाचे सभासद नसतील, अशा सभ्य गृहस्थांस देखील त्यांत नेमूं शकतील; आणि ते मुंबई आर्यसमाजाच्या अंतरंग सेभच्या संमतीनुरूप पुस्तकालयाचा सर्व प्रबंध करतील. आणि प्रत्येक सालाचा वार्षिक वृत्तांत सभासदांच्या ठरावासुद्धां मुंबई आर्यसमाजाच्या साधारण वार्षिक सभेस विदित करण्यासाठीं एक मास पूर्वी पुस्तकालयाच्या सभासदांची सभा भरून अंतरंग सभेकडे मंत्रीद्वारें पाठऊन दिला जाईल.

क. प्रत्येक सालीं व्यवस्थापक उपसभेचे अधिकारी व व्यवस्थापक, हे आर्यसमाजाचे वार्षिक साधारण सभेंत नेमले जातील. त्यांत जुने सभासदही पुनः नेमूं शकतील.

ख. साल पुरें होण्यांपूर्वी एखाद्या अधिकाऱ्याची किंवा व्यवस्थापकाची जागा रिकामी झाली असतां, अंतरंग सभा स्वतःच्या अधिकारानें दुसऱ्या एखाद्या योग्य पुरुषास त्या स्थानी नेमूं शकेल.

ग. एखादें महत्त्वाचें कार्य करण्यास अगर करविण्यास आपल्या पैकीं सभासद आणि त्या कामीं झटणारे इतर आर्य सभासद किंवा स्वदेश हितवर्धक भद्र पुरुष अशांस मिळवून उपसभा नेमून अंतरंग सभेच्या संमतीनें तें कार्य करवूं शकतील.

घ. व्यवस्थापक सभेपैकीं कोणताही सभासद मंत्र्याकडे आठ दिवस आगाऊ; पुढें भरणाऱ्या व्यवस्थापक उपसभेस कळविण्याकरितां जी विज्ञापना पाठवील, ती प्रमूखांच्या हुकूमान्वयें कळविली जाईल; परंतु तो

विषय कळविण्यांत व्यवस्थापक उपसभेचे तीन सभासद लेखी संमती देतील तर अवश्य कळविला जाईल.

ङ. प्रत्येक महिन्यास प्रमुखाच्या हुकूमानें एक वेळ व्यवस्थापक उपसभा भरेल, किंवा तीन सभासदांच्या लेखी सूचनेवरून देखील भरली जाईल.

## प्रमूख.

६. प्रमुखाकडे खालीं लिहिलेले अधिकार व कामें नेमलीं जातील.

क. व्यवस्थापक उपसभा व तिनें उभारलेल्या अन्य सर्व उपसभेचा त्यास सभापती मानलें जाईल.

ख. सर्वदां पुस्तकालयाच्या एकंदर कामांचा यथायोग्य बंदोबस्त करण्यांत व त्याची उन्नति व रक्षण करण्यांत तत्पर राहील. पुस्तकालयाच्या प्रत्येक कामावर नजर ठेवील कीं, तीं नियमानुसार होतात किंवा नाहींत व आपणही नियमानुसार वर्तन करील.

ग. एखादे वेळीं विशेप अवघड कामाची जरूर लागल्यास त्याचा उचित् बंदोबस्त अध्यक्ष तेव्हांच करूं शकेल. कारण, त्याच्या बिघाडाबद्दल समाजाला उत्तरदाता तोच होईल.

घ. एखाद्या मासिक सभेंत कारणपरत्वें प्रमूख हजर नसला, तर व्यवस्थापक सभा आपणां पैकीं एखाद्या योग्य पुरुषास त्याच्या जागीं नेमून काम चालवूं शकेल.

## मंत्री.

७. मंत्र्याकडे खालीं लिहिलेलीं कामें व अधिकार नेमले जातील.

क. व्यवस्थापक उपसभेच्या आज्ञेप्रमाणें ह्या पुस्तकालया मार्फत सर्वांबरोबर पत्रव्यवहार ठेवावा. सर्व प्रकारचीं विशिष्ट पत्रें मागील

खात्यांची विल्हेवारी, वृतांत पुस्तक, नोंद, यादी, सभासदांचें रजिस्टर, पुस्तकांची नोंद वगैरे एकंदर खत पत्रें सांभाळून ठेवावीं.

ख. व्यवस्थापक उपसभेच्या ठरावांची नोंद करून त्याजवर प्रमूखाची सही घ्यावी.

ग. फारकरून पुस्तकालयांत असलेल्या नोकरांच्या कामांवर देखरेख ठेऊन, उपसभेच्या कामांची व्यवस्थापक उपसभेस वर्दी द्यावी.

घ. आवकजावक ह्यावर नजर ठेवावी. दर महिन्याचा हिशेब तयार करून आर्यसमाजाच्या मंत्र्याकडे पाठऊन द्यावा. कांहीं अव्यवस्था आढळली असतां ताबडतोब आर्य समाजाच्या मंत्र्याकडे लिहून पाठवावी; व ती पुस्तकालयाचे अध्यक्षास विदित करावी.

ङ. पुस्तकालयाचा आलेला पैसा, पुस्तकें वगैरे जीं कांहीं येतील तीं स्वीकारून त्यांची पावती द्यावी. त्यांचें नीट रक्षण करून महिना अखेरे व्यवस्थापक उपसभेच्या संमतीनें; खर्च बाद करून शिल्लक रकम मुंबई आर्यसमाजाच्या मंत्र्याकडे हिशोबासुद्धां पाठऊन त्याची पावती घ्यावी.

च. एकंदर रकमेचा जमाखर्च ठेऊन त्याची खातेवारी ठेवावी. त्याचा दरहा व्यवस्थापक उपसभेकडून तपास होऊन आल्यावर, तो सर्व हिशोब एकंदर खातेवारी सहित मुंबई आर्यसमाजाचे अंतरंग सभेच्या मंजूरीसाठीं पुस्तकाध्यक्षाकडे पाठवावा.

छ. मुंबई आर्यसमाजाचा पुस्तकाध्यक्ष जीं जीं पुस्तकें विक्रीसाठीं ठेवील तीं विकावीं. जीं पुस्तकें सभासदांस घरीं वाचावयास देण्याचा हुकूम नसेल,त्यांजवर चिन्हें करून ठेवावीं व सभासदांस विदित करावें. पुस्तकांची नोंद हर वेळीं मागितल्यास दाखवावी. तशीच पुस्तकें तपासण्यास मागीतली असतां तपासूं द्यावीं. एकंदर जिनसांचा खुलासा

द्यावा. जमाखर्चाची वही हमेश पहावयास मागितली असतां द्यावी. एखादा सभासद पुस्तक उतरून घेण्यासाठीं मागेल, तर त्याची व्यवस्था पुस्तकाध्यक्षाच्या विचारानें करावी.

## मिश्रित.

८. प्रत्येक सभासद जों पर्यंत ह्या पुस्तकालयाचा सभासद कायम असेल, तों पर्यंत त्यास त्या वर्गाचे पुस्तकालयाचे सर्व हक्क मिळतील.

९. एखादा सभासद ह्या पुस्तकालयाचे नियमांविरूद्ध वर्तन करील अथवा पुस्तकालयांतील पुस्तक, मासिक पुस्तक, वर्तमानपत्र किंवा इतर अन्य मिळकतींचा खराबा करील, किंवा गैरशिस्त उपयोग करील अगर व्यवस्थापक उपसभा किंवा तिच्यांतील अधिकाऱ्यांच्या नियमसर हुकुमांची अवज्ञा करील, किंवा पुस्तकालयाच्या स्थानांत किंवा सभेंत अपमान करील, अथवा एखादा सभासद हर कोणत्याही सभादाच्या गैर वर्तणुकीबद्दल व्यवस्थापक उपसभेची खात्री करून देईल, आणि व्यवस्थापक उपसभेच्या नजरेस असें येईल कीं, पुस्तकालयाचे लाभार्थ त्या सभासदास ह्या पुस्तकालयाच्या सभासदांतून दूर करावें. तर त्याचें नांव पुस्तकालयाचे नोंदीतून छेकून टाकून पुस्तकालयाचे हक्कांतून दूर करण्यास व्यवस्थापक उपसभा मुखत्यार आहे.

१०. पुस्तकालय प्रत्य रोज सकाळीं सात पासून रात्रौ नऊ वाजत तोंपर्यंत मोकळें राहील, आणि पुस्तकें देण्याघेण्याचें काम फक्त सकाळीं दहा वाजेपर्यंत ठेवलें जाईल.

११. नियमित वेळीं व ठरविलेल्या अनुक्रमाप्रमाणें पुस्तकालयांतील पुस्तकें व मासिक पुस्तकें बाहेर दिलीं जातील, परंतु त्यांची जरूर लागली असतां मंत्री ज्या वेळीं मागेल त्या वेळीं ताबडतोब पाठवून दिलीं पाहिजेत. पुस्तक किंवा मासिक पुस्तक ह्यांजवर कोणी

नाव वगैरे लिहूं नये, किंवा हरएक प्रकारची निशाणी, चित्र वगैरे काढूं नये. जसें नेलें असेल तसेंच परत द्यावें. जो कोणी बिघडवील, किंवा हरवील तर त्याजपासून, त्याला जी किंमत पडेल ती भरून घेतली जाईल; पण तें पुस्तक कोठेंही विकत मिळत नसलें, तर व्यवस्थापक उपसभा ठरवील ती रकम त्याजपासून घेतली जाईल. नवीन आलेली पुस्तकें, मासिक पुस्तकें टेबलावर चार दिवस पर्यंत सभासदांला वाचावयास देऊन नंतर बाहेर दिलीं जातील. प्रथम दिलीं जाणार नाहींत. जे कोणी पुस्तकें मागून नेतील त्यांनीं पुस्तकालयाच्या नोंद बुकांत सही करून घ्यावीं अथवा पत्र लिहून मागून घ्यावीं. त्याशिवाय कोणासही पुस्तकें मिळणार नाहींत. तसेंच ह्या पुस्तकालयांतील पुस्तक, मासिक पुस्तक वगैरे ज्यांचा ह्या पुस्तकालयाशीं संबंध नसेल त्यांस देण्याचा अधिकार सभासदांस नाहीं. पुस्तक अगर मासिक पुस्तक मागणारांची नोंद त्यानें मागीतल्या तारखेच्या अनुक्रमानें दिली जाईल. मासिक पुस्तक चार दिवस व इतर पुस्तक आठदिवसांहून अधिक कोणांजवळ ठेवलें जाणार नाहीं, आणि तीं मुंबईच्या बाहेर घेऊन जाण्याचा सभासदांस अधिकार नाहीं. पंचांग, कोश, नकाशा व तशींच जीं इतर पुस्तकें वगैरे देण्याचा मुंबई आर्यसमाजाचे पुस्तकाध्यक्षानें प्रतिबंध केला असेल तीं, छापलेले कागद, चित्रें इत्यादि ज्यांचा वारंवार खप लागेल तीं कोणासही पुस्तकालयांतून बाहेर नेऊं दिलीं जाणार नाहींत.

१२. कारकुनानें नेमलेल्या वेळीं हजर राहावें व वर दर्शविलेल्या ठरावांन्वयें आपलें काम करावें. वर्गणीचा वसूल करावा. पुस्तकालयाची मिळकत, पुस्तकें; मासिक पुस्तकें व वर्तमान पत्रें वगैरे ह्यांचा हिशोब ठेवावा. पुस्तकें व मासिक पुस्तकें द्यावीं, घ्यावीं व बाहेर द्यावीं घ्यावीं व त्यांची नोंद ठेवावी, मिनिट बुक लिहावें, सभासद येतील त्यांची आदत

ठेवावी. पुस्तकालयाच्या स्थानाची व्यवस्था ठेवावी व दुसरें जें काम मुंबई आर्यसमाजाचा मंत्री सांगेल तें करावें.

१३. सभासदांवर त्रिमासिक बिलें करावीं, तीन महिन्याच्या आंत जो सभासद होईल, त्याजकडून त्या महिन्याची वर्गणी घ्यावी. जो सभासद एक सारखीं तीन बिलें चढवील, त्याचें नांव सभासदांच्या लिस्टांतून काढून टाकण्यास व त्याचा पुस्तकालयाशीं असलेला संबंध दूर करण्यास; आणि वर्गणी वसूल करण्यास अथवा त्याच्या नांवें प्रसिद्धपणें पुस्तकालयांत कळविण्यास व्यवस्थापक उपसभा मुखत्यार आहे.

१४. पुस्तकालयाचा एकंदर हिशोब वार्षिक सभेंत रुजू करण्यापूर्वीं पुस्तकालयाच्या स्थानांत सर्वांच्या अवलोकनार्थ आठ दिवस आगाऊ टेबलावर ठेवला जाईल.

१५. ह्या पुस्तकालयांत विद्यार्थ्यांच्या लाभार्थ पुस्तकें, मासिक पुस्तकें व वर्तमान पत्रें वगैरे देण्याचा ठराव असा झाला आहे कीं, जो विद्यार्थी पहिल्या वर्गाच्या जन्मपर्यंतच्या सभासदाचें भलामणपत्र आणून देईल व पुस्तकालयांत उत्तम प्रकारचें वर्तन करील, तर त्याला पुस्तकालयाचा लाभ एकवर्ष पर्यंत दिला जाईल. तसेंच मुंबई आर्यसमाजाच्या अंतरंग सभेस लिहिलें असतां, तिला योग्य वाटल्यास अमुक मुदती पर्यंत पुस्तकालयांत दाखल करूं शकेल.

# शुद्धिपत्र.

( पृष्ठ१६. वार्षिकसभा. * ह्यावरील राहिलेली टीप.)

* ह्या सभेचें काम चतुर्थांश सभासद हजर असल्याशिवाय चालविलें जाणार नाहीं, परंतु दोन वेळ सभा बोलावून कोरम पुरें न झाल्यास जे सभासद हजर असतील, तेच सभेचें काम चालवूं शकतील. ह्या सभेंत जें काम केलें जाईल तें व सभासदांनीं चार दिवस पूर्वी लिहून पाठविलें असेल तें दाखल केलें जाईल; व ह्या सभेबद्दल आठ दिवस अगाऊ विज्ञापन पत्र सभासदांकडे पाठविलें जाईल.

6

# विक्रीचीं पुस्तकें.

प्रत्येक रविवारीं संध्याकाळीं आर्य समाजांत विकलीं जातात.
बाहेर गांवीं मागविणारांस पोस्टेज पडेल.

| हिंदि पुस्तकें. | किंमत. | पोष्टेज. | गुजराथी. | किंमत | पो. |
|---|---|---|---|---|---|
| सत्यार्थ प्रकाश. | २॥= | -।= | पंचमहायज्ञविधी. | ८≡ | ० |
| सभाप्रसन्न. | -।— | ८— | गोकरुणानिधी. | ८— | ८॥ |
| वेदान्त कथा. | ८।॥- | ८॥- | | | |
| अथर्ववेद संहिता. | ४ | -।- | आर्यसमाजना अने दयानन्दपुस्तकालयना नि. | ८॥- | ८॥- |
| मृतक श्राद्ध खंडन. | ८—।॥- | ८॥- | | | |
| ...ति सुधाकर. | ८= | ८॥- | | | |
| ...न. नं. ४० | -।॥- | ८॥- | मराठी आर्य समाजाचे व दयानन्द पुस्तकालयाचे नियम. | ८॥- | ८॥ |
| ... नं. ६८ | -।॥- | ८॥- | | | |
| ...ती महाराणीजीकी प्रशंसा. | ८— | ८॥- | | | |
| सं... व्याख्यानम्. | ८॥- | ८॥- | | | |
| मं...विधि. | -।-॥- | ८॥- | | | |
| आर्या...नय. | -।—॥- | ८॥- | | | |
| आर्या...मणी. | ८≡ | ८॥- | | | |
| गर्भाधा...विधि. | ८=॥- | ८॥- | | | |
| जीवन...ा. | ८।॥- | ८॥- | | | |
| विनय...त्रिका. | -।= | ८— | | | |
| श्राद्ध...विक. | ८= | ८॥- | | | |
| साधु...ी करतूक. | ८≡ | ८॥ | | | |
| प्रत्येक...आर्य. | ८॥- | ८॥- | | | |
| सत्या...थ विवेक. | ८=॥- | ८॥- | | | |
| पोपल...ा. | -।- | ८॥- | | | |
| आर्य समाज परिचय. | -।— | ८॥- | | | |
| द्वैताद्वैत संवाद. | -।- | ८॥- | | | |
| सत्यासत्य विवेक. | ८= | ८॥- | | | |

खालीं लिहीलेलीं पुस्तकें फक्त अर्धा आणा पोस्टेज पाठविलें असतां फुकट दिलीं जातील.

हिंदुस्थान अने गाय, गुजराती.
,, मराठी.
,, कानडी.
सत्यासत्य विचार, हिंदी.

गोरक्षोपदेशक मंडाळीचे मराठी व गुजराथी नियम.

नारींग पत्र घेतलें जाणार नाहीं.

# ENGLISH BOOK'S.

| | Price. | | | Postage. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Rs. | A. | P. | Rs. | A. | P. |
| A Triumph of Truth ... | 1 | 6 | 0 | 0 | 4 | 0 |
| Arya Catechism ... | „ | 3 | „ | „ | 1 | 0 |
| The Belief of Maharshi Swami Dayanund | „ | 2 | „ | „ | 0 | 6 |
| Dogmas of Christianity | „ | 2 | „ | „ | 0 | 6 |
| Vews of Andrew Jackson Davis on Arya Samaj | 0 | 6 | | „ | 0 | 6 |
| Litany ... ... | „ | 1 | „ | „ | „ | |
| Ishopnishad with English Commentary by Professor Guroo Dutt. M. A. | „ | 7 | „ | „ | 1 | |
| Vedic Text „ ... | „ | 1 | 6 | „ | „ | |
| „ The Atmosphere | | 1 | 6 | „ | „ | |
| „ Composition of water | „ | 1 | 6 | „ | 0 | |
| ( गृहस्थ ) | | | | | | |
| Atheism and angnastism | „ | 3 | „ | „ | 1 | 0 |
| Terminology of The Vedas | „ | 5 | „ | „ | 1 | |
| A word with the Non believers in Revelation | „ | 4 | „ | „ | 1 | |